**नि.फौ.ख.क्र.५७/२०२३**
शासन–वि–बाबुराव चव्हाण
**नि.क्र.३५.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी**
मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की,
नाव – संगिता शिवाजी चव्हाण,
वय – ५५ वर्षे, व्यवसाय – गृहिणी,
राहणार– दापोडी, ता. दौंड, जि. पुणे.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आधंळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–**

१. वादातील घटना दि. ०५.०६.२०२२ रोजी दापोडी येथे सकाळी ११.३० वाजता माझ्या राहत्या घराजवळ घडली होती. त्या दिवशी मी आणि माझे पती कामावर गेलो होतो. तेव्हा बाबुराव चव्हाण हे आमच्या जागेमध्ये बांधकाम करत होते. तेव्हा माझ्या पतीने आमच्या जागेत बांधकाम करु नका असे त्यांना सांगितले. त्यामुळे त्यांनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यांनी माझ्या पतीला धक्काबुक्की करुन मारहाण केल्याने ते जमिनीवर पडले. त्यानंतर बाबुराव चव्हाण याने जवळची वीट घेऊन माझ्या पतीच्या डोक्यात मारला. त्यामुळे माझ्या पतींना रक्तस्त्राव सुरु झाले. मी हे पाहून ओरडले आणि त्यानंतर माझ्या पतींना दवाखान्यात घेऊन गेले. सर्वप्रथम या घटनेनंतर आम्ही यवत पोलीस स्टेशनला गेलो. त्यांनी आम्हांला दवाखान्यात जाण्याबाबत चिठ्ठी दिल्यानंतर यवत येथील सरकारी दवाखान्यात मी माझ्या पतींना घेऊन गेले. तेथे माझ्या पतींना टाके टाकले आणि पुढील उपचाराकरिता ससून हॉस्पीटलमध्ये घेऊन जाण्यास सांगितले. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकते. आरोपी आज न्यायालयात हजर नाही. आरोपीची ओळख आव्हानित न करण्याच्या अटीवर त्याची गैरहजेरी माफ करण्यात आलेली आहे. ज्या विटेने माझ्या पतीला मारण्यात आले ते पाहिल्यास ओळखू शकते. आता मला दाखविण्यात आलेला आर्टीकल बी वरील वीट तीच आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी. डी. खंडागळे यांच्यामार्फतः–**

२. हे म्हणणे खरे आहे की, माझी मुलगी वकील असून ती कोर्टात प्रॅक्टीस करते. घटनास्थळापासून केडगाव पोलीस स्टेशन तीन किमी अंतरावर आहे. माझ्या घरी चारचाकी व दुचाकी दोन्ही वाहने आहेत. घटनास्थळापासून वाहनाने पोलीस स्टेशनला जाण्यास १० मिनीटे लागतात. केडगावपासून ते दापोडी येथील बांधकामाचे ठिकाण ३ किमी अंतरावर आहे. बांधकामाच्या ठिकाणी जाण्यास आम्ही किती वाजता निघालो हे मी नक्की सांगू शकत नाही. हे

म्हणणे खरे आहे की, आमच्यात आणि आरोपीमध्ये जागेबाबत अनेक वर्षापासून वाद सुरु आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या जागेबाबत दौंड न्यायालयात आणि मुंबई उच्च न्यायालयात केसेस प्रलंबित आहेत. घटना घडल्यानंतर पोलीस पंचनामा करण्यासाठी आले होते. पोलीसांचे नाव जाधव होते पंचांचे नाव मी सांगू शकत नाही. पोलीसांनी माझ्या पतीचे रक्ताचे माखलेले कपडे घेतले होते. साक्षीदार म्हणते, ते कपडे आम्हांला पोलीसांनी परत दिले. माझे रक्ताचे सॅम्पल घेतले होते अगर कसे हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आसपास ७० ते ८० लोकांची राहती घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, केडगाव परिसरात अनेक वीटभट्ट्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीसोबत आधीपासून वाद असल्यामुळे त्याच्याविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत. समक्ष

Sd/-

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**

दिनांकः- ०२.०४.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.